# सातारा तालुका पोलीस ठाणे,सातारा

राधीका रोड,ता.जि.- सातारा-४१५००१

दुरध्वनी क्र- ०२१६२-२३८६०७

ई-मेल- sataratps.satara@mahapolice.gov.in


## प्रेसनोट दिनांक- ०४/०९/२०२६

## सातारा तालुका पोलीस स्टेशन गुन्हे प्रकटीकरण शाखेची मोठी कारवाई ट्रान्सफॉर्मर (डीपी) चोरीतील संशयीत आरोपीस केले जेरबंद

(सातारा तालुका पोलीस ठाणेतील एकुण १४ गुन्हे उघडकीस आणुन एकुण ५,८८,०००/-रु.कि.चा मुद्देमाल हस्तगत)

सातारा तालुका पोलीस ठाणे हददीतील गावामधील शेतामध्ये असलेल्या ट्रान्सफॉर्मर मधील कॉपर वायर चोरीचे प्रकार मोठया प्रमाणात वाढल्याने मा.पोलीस अधीक्षक सो,सातारा श्री.निखील पिंगळे व मा.अपर पोलीस अधीक्षक सो,सातारा,श्रीमती वैशाली कडुकर,मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो, सातारा शहर विभाग,सातारा श्री.विपुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा तालुका पो.ठाणे चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री.निलेश तांबे यांनी ट्रान्सफॉर्मर चोरीतील चोरटयांचा तात्काळ शोध घेवुन त्यांचेवर कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे सातारा तालुका पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.हवा पंकज ढाणे ब.नं २१८६ यांना गोपनिय माहिती प्राप्त झालेने डिबी पथकाने ठिकठिकाणी आरोपीचा शोध घेवुन त्यांची गोपनीय बातमीदार मार्फतीने कौशल्यपुर्वक आरोपींची माहीती काढुन पोलीस ठाणेस दाखल गुन्हयातील संशयीत आरोपीस जेरबंद करुन आरोपीकडे डि.बी पथकाने कौशल्यपुर्वक विचारपुस करुन माहीती काढली असता संशयीत आरोपीने सातारा तालुका पोलीस ठाणे हददीत गुन्हे केले असल्याचे कबुली दिल्याने सातारा तालुका पोलीस ठाणे हददीतील एकुण १४ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. एकुण १४ गुन्हयामधील कॉपर तार (तांब्याची तार) असा एकुण ५,८८,०००/- रु.कि.चा मुद्देमाल जप्त करणेत आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोहवा गोरे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री.निखील पिंगळे,मा.अपर पोलीस अधिक्षक श्रीमती वैशाली कडुकर, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.विपुल पाटील,पोलीस निरीक्षक श्री.निलेश तांबे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री.सुदर्शन काटकर, सहा.पोलीस निरीक्षक श्री.चंद्रहार पाटील तसेच **गुन्हे प्रकटीकरण शाखेचे** पोलीस अधिकारी पोलीस उपनिरीक्षक अभिजीत गुरव व **गुन्हे प्रकटीकरण शाखेचे** पोलीस अंमलदार पंकज ढाणे, मनोज गायकवाड, राजु शिखरे, दादा स्वामी, संदीप पांडव, **बीट अंमलदार-** रामचंद्र गोरे, मालोजी चव्हाण, प्रविण वायदंडे, मपोहवा मोना बोराटे, **दप्तरी-** संदीप आवळे, पोहवा सतिष बाबर, सुनिल भोसले, संदीप फणसे यांनी केली आहे.

सदर कारवाईमध्ये सहभाग घेणारे अधिकारी व अंमलदार यांचे मा.पोलीस अधीक्षक सो,सातारा व मा.अपर पोलीस अधीक्षक सो,सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

**पोलीस अधीक्षक सातारा यांच्या मान्यतेने**

**प्रति,**

**सर्व वृत्तपत्र संपादक, सातारा जिल्हा**
**सर्व मिडीया प्रतिनिधी सातारा**